K.T.S.P.Mandal's

Hutatma Rajguru Mahavidyalaya, Rajgurunagar.

Department of Economics

HOD – Dr.R.S.Shirasi

Class:- S.Y.B.A(DSE-1B)

Subject:- Micro Economics (S1-II)

सूक्ष्म अर्थशास्त्र (S1)

SEM IV

Sub Teacher - Assi.Prof.Dhanapune S.V.

घटक :- Unit No. 4 कल्याणकारी अर्थशास्त्राची ओळख

उपघटक :- कल्याणकारी अर्थशास्त्र : अर्थ आणि व्याख्या

पिगू यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र

कल्याणकारी अर्थशास्त्राविषयी अमर्त्य सेन यांचे विचार

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

Unit No. 4

कल्याणकारी अर्थशास्त्राची ओळख

(Introduction to Welfare Economics)

4.1 कल्याणकारी अर्थशास्त्र : अर्थ आणि व्याख्या

Introduction to welfare Economics

4.1.1 कल्याणकारी अर्थशास्त्राचा अर्थ

Welfare Economics : Meaning and Definitions

4.1.2 कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याख्या

Welfare Economics : Definitions

4.1.3 कल्याणकारी अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये

Welfare Economics : Characteristics

4.2 पिगू यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र

Pigovian Welfare Economics

4.2.1 पिगू यांच्या कल्याणाच्या अर्थशास्त्राचे मूल्यमापन व टीका

Evaluation & Critique of Pigu's Economics of Welfare

4.3 कल्याणकारी अर्थशास्त्राविषयी अमर्त्य सेन यांचे विचार

Thought of Amartya Sen on Welfare Economics

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

कल्याणकारी अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची एक स्वतंत्र शाखा आहे. कल्याणकारी अर्थशास्त्र संपूर्ण अर्थव्यवस्थेच्या स्तरावर सूक्ष्म आर्थिक तंत्राचा वापर करून कल्याणाचे मूल्यांकन करते.

कल्याणकारी अर्थशास्त्रात सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाला विशेष महत्त्व दिले जाते. महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी कल्याणकारी अर्थशास्त्रात साधनसामग्रीची कार्यक्षम वाटणी करणे आणि अपव्यय टाळणे, स्पर्धात्मकतेत वाढ करणे, आर्थिक स्वातंत्र्याला चालना देणे या बाबींवर विशेष लक्ष दिले जाते. उत्पन्नाच्या वाटणीद्वारे आर्थिक समानता प्रस्थापित करण्यासाठी धोरणनिश्चितीवर कल्याणकारी अर्थशास्त्र भर देते.

प्रस्तुत प्रकरणात कल्याणकारी अर्थशास्त्राचा अर्थ आणि व्याख्या, प्रा. ए. सी. पिगूंचे कल्याणकारी अर्थशास्त्र आणि अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्राविषयीचे विचार या संदर्भात विवेचन केलेले आहे.

4.1 कल्याणकारी/कल्याणविषयक अर्थशास्त्र : अर्थ आणि व्याख्या

(Welfare Economics : Meaning and Definitions)

4.1.1 कल्याणकारी अर्थशास्त्राचा अर्थ

(Welfare Economics : Meaning)

कल्याणकारी अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची एक स्वतंत्र शाखा आहे. कल्याणकारी अर्थशास्त्र ही अर्थशास्त्राची शाखा अर्थव्यवस्थेच्या रचनेचा अभ्यास करते. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या माध्यमातून समाजाच्या पातळीवर संसाधने आणि वस्तू यांचे कार्यक्षम

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

वाटप कसे होते याचा अभ्यास केला जातो. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या अभ्यासाचा हेतू समाजाचे एकूण कल्याण साध्य करणे हा आहे. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये समाजाच्या कल्याणात महत्तम वाढ करून आर्थिक आणि सामाजिक धोरणांचे मूल्यमापन केले जाते. कल्याणकारी अर्थशास्त्रात प्रामुख्याने खर्च-लाभ विश्लेषण आणि सामाजिक कल्याण फलन यांचा अभ्यास केला जातो.

कल्याणकारी अर्थशास्त्रात समाजातील वेगवेगळ्या घटकांच्या सामाजिक कल्याणाचा अभ्यास करताना सामाजिक कल्याणाचे मापन व तुलना केली जाते.

4.1.2 कल्याणकारी अर्थशास्त्राच्या व्याख्या

(Welfare Economics : Definitions)

कल्याणकारी अर्थशास्त्राची सर्वमान्य अशी एक व्याख्या देता येत नाही. कल्याणकारी अर्थशास्त्राच्या काही प्रमुख व्याख्या पुढीलप्रमाणे

कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे अर्थशास्त्राची अशी शाखा की, ज्या शाखेत उत्पन्न, संसाधने आणि वस्तूंच्या वाटणीचा आर्थिक कल्याणावर कसा प्रभाव पडतो याचा अभ्यास केला जातो.

कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे संसाधने आणि वस्तूंची वाटणी यांचा सामाजिक कल्याणावर कसा प्रभाव पडतो याविषयी अभ्यास करणारी अर्थशास्त्राची शाखा होय. याचा संबंध प्रत्यक्षपणे आर्थिक कार्यक्षमता आणि उत्पन्नाची वाटणी यांच्याशी येतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

व्यावहारिकदृष्ट्या या दोन घटकांचा प्रभाव अर्थव्यवस्थेतील सर्व लोकांच्या कल्याणाशी येतो.

- **"कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे अर्थशास्त्रीय सिद्धान्ताचा असा भाग, जो मुख्यत्वे आर्थिक धोरणाशी निगडित असतो."** स्लटस्की

वरील व्याख्येमध्ये सरकारी धोरणाद्वारे आर्थिक कल्याणासाठी केल्या जाणाऱ्या उपाययोजना अभ्यासल्या जातात.

- **"व्यक्तीला वस्तूंच्या उपभोगापासून मिळणारी उपयोगिता, समाधान किंवा आनंद म्हणजे आर्थिक कल्याण होय."** - डॉ. मार्शल

डॉ. मार्शल यांनी कल्याणाच्या अर्थशास्त्राचा संबंध व्यक्तीला वस्तूच्या उपभोगापासून मिळणाऱ्या उपयोगितेशी जोडलेला आहे.

- **"कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक कल्याण होय. आर्थिक कल्याण म्हणजे सामान्य किंवा सामाजिक कल्याणाचा असा भाग की, ज्याचे पैशाच्या मापदंडाच्या साहाय्याने प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मापन करता येते."**

- प्रा. ए. सी. पिगू

प्रा. पिगू यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राचा संबंध पैशाच्या साहाय्याने प्राप्त होणाऱ्या लाभांशी जोडलेला आहे. प्रा. पिगू यांच्या मते, कल्याण माणसाच्या

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

मनाच्या अवस्थेत असते. समाधानातून कल्याणाची निर्मिती होते. व्यक्तीच्या इच्छा, आकांक्षा किती पूर्ण होतात हा आर्थिक कल्याणाचा आधार आहे.

- **“सामाजिक समाधानाच्या मापदंडाच्या आधारावर अर्थव्यवस्थेच्या कार्यक्षमतेचे विश्लेषण म्हणजे कल्याणकारी अर्थशास्त्र होय."** **- प्रा. बाबर**

- **"कल्याणकारी अर्थशास्त्र हे मुख्यत्वे धोरणात्मक समस्येशी निगडित असते. संसाधनांचे वाटप कसे होते, या दृष्टिकोनातून विविध वस्तूंच्या निर्मितीसाठी आदानांची वाटणी आणि विविध उपभोक्त्यांमध्ये वस्तूंची वाटणी याचा अभ्यास कल्याणकारी अर्थशास्त्र करते."** **- प्रा. डब्लू. जे. बामूल**

4.1.3 कल्याणकारी अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये (Welfare Economics : Characteristics)

कल्याणकारी अर्थशास्त्राच्या वरील व्याख्यांवरून कल्याणकारी अर्थशास्त्राची पुढील वैशिष्ट्ये नमूद करता येतील.

1. कल्याणकारी अर्थशास्त्र अर्थशास्त्राची एक स्वतंत्र शाखा आहे.

2. कल्याणकारी अर्थशास्त्र सर्वसाधारण कल्याणाचा एक भाग आहे. कल्याणकारी अर्थशास्त्रामध्ये संसाधनांचा महत्तम वापर करण्यावर भर दिला जातो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

3. कल्याणकारी अर्थशास्त्रात दुर्मीळ साधनसामग्रीचा पर्याप्त वापर करून उत्पादन, नफा आणि रोजगार पातळीमध्ये कशी वाढ करायची याचा अभ्यास केला जातो.

4. कल्याणकारी अर्थशास्त्राची सुरुवात सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रातील उपयोगिता सिद्धान्ताच्या आधारे केली जाते. सूक्ष्मलक्षी अर्थशास्त्रातील विविध तंत्रे वापरून कल्याणकारी अर्थशास्त्राच्या संकल्पना स्पष्ट केल्या जातात.

5. सार्वजनिक धोरणाची आखणी करण्यासाठी कल्याणकारी अर्थशास्त्र मार्गदर्शन करते.

6. कल्याणकारी अर्थशास्त्रात वैयक्तिक उपयोगितेची बेरीज करून संपूर्ण समाजाचे सामाजिक कल्याण साध्य करण्यावर भर दिला जातो.

7. डॉ. मार्शल यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या देताना उपभोक्ते आणि उत्पादक यांचे संतोषाधिक्य महत्तम करण्यावर भर दिलेला आहे.

8. प्रा. पिगू यांनी कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या देताना उत्पादनाची कार्यक्षमता आणि उत्पन्नाच्या योग्य वाटपावर भर दिलेला आहे.

9. कल्याणकारी अर्थशास्त्र हे आदर्शानुसारी शास्त्र असून या शास्त्रात सर्वोत्तम काय आहे याचा विचार करून संसाधनांच्या पर्याप्त वापराला महत्त्व दिलेले आहे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

10. कल्याणकारी अर्थशास्त्राचा अभ्यास हा व्यक्तिनिष्ठ स्वरूपाचा अभ्यास आहे. व्यक्ती अथवा संपूर्ण समाजाच्या कल्याणाचा अभ्यास करताना कल्याणाची व्याख्या, मापन आणि तुलना कशी करायची हे निवडलेल्या गृहीतांवर अवलंबून असते.

4.2 पिगू यांचे कल्याणकारी अर्थशास्त्र

((Pigovian Welfare Economics)

केंब्रिज विद्यापीठातील प्राध्यापक आर्थर सेसिल पिगू यांनी डॉ. मार्शल यांच्यानंतर आघाडीचे नवसनातनवादी अर्थशास्त्रज्ञ म्हणून कल्याणाच्या अर्थशास्त्रामध्ये मोलाची भर घातली. इ.स. 1920 मध्ये 'The Economics of Welfare' या त्यांच्या सुप्रसिद्ध ग्रंथात त्यांनी कल्याणकारी अर्थशास्त्रज्ञांच्या संदर्भात अग्रगण्य कल्पना मांडल्या. प्रा. पिगू यांना कल्याणकारी अर्थशास्त्राचे जनक म्हणून संबोधले जाते. प्रा. पिगू यांनी प्रथम कल्याण हा शब्द प्रचलित केला आणि कल्याण या शब्दाला खरा अर्थ प्राप्त करून दिला.

प्रा. पिगू यांनी कल्याणाच्या संदर्भात पुढील तीन गोष्टी आपल्या पुस्तकात नमूद केल्या.

1. आर्थिक कल्याणाची व्याख्या

2. अधिकतम/महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी अटी स्पष्ट केल्या.

3. आर्थिक कल्याणात वाढ करण्यासाठी कोणते धोरण राबवावे याबाबत शिफारशी केल्या.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

प्रा. पिगू यांनी व्यक्तिगत आर्थिक कल्याण आणि सामाजिक कल्याण या दोन संकल्पना मांडल्या. प्रा. पिगू यांच्या मते, व्यक्तीचे आर्थिक कल्याण म्हणजे विनिमय योग्य वस्तू आणि सेवांच्या उपभोगापासून मिळणारी उपयोगिता होय. या उपयोगितेचे पैशाच्या साहाय्याने मापन करता येते. सामाजिक कल्याण म्हणजे व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या कल्याणाची बेरीज होय. थोडक्यात, देशातील सर्व व्यक्तींना प्राप्त होणाऱ्या व्यक्तिगत कल्याणांची बेरीज म्हणजे सामाजिक कल्याण होय.

कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या :

- **"कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे आर्थिक कल्याण होय. आर्थिक कल्याण हा सामान्य किंवा सामाजिक कल्याणाचा असा भाग असतो, की जो प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे पैसा या मापदंडाशी संबंधित असतो."**

आर्थिक कल्याणाची व्याख्या :

- **"पैशाच्या साहाय्याने ज्या वस्तू व सेवा खरेदी करता येतात त्या वस्तू व सेवांच्या उपभोगापासून मिळणारे समाधान म्हणजे आर्थिक कल्याण होय."**

सर्वसाधारण कल्याणाची संकल्पना खूप विस्तृत आणि क्लिष्ट आहे. त्यामुळे प्रा. पिगू यांनी आपला अभ्यास आर्थिक कल्याण या संकल्पनेपुरता मर्यादित केला. आर्थिक कल्याण हा सामाजिक कल्याणाचाच एक भाग आहे. पैशाच्या मापदंडाच्या साहाय्याने आर्थिक कल्याणाचे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष मापन करता येते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

प्रा. पिगू यांनी कल्याणाची संकल्पना मांडताना आर्थिक घटकांमुळे प्राप्त होणाऱ्या भौतिक कल्याणाचा विचार केलेला आहे, आर्थिकेतर घटकांमुळे निर्माण होणाऱ्या कल्याणाचा विचार केलेला नाही,

पिगू यांच्या मते, आर्थिक कल्याण आणि राष्ट्रीय उत्पन्न या दोहोंमध्ये समन्वय आहे. कल्याणाच्या महत्तमीकरणासाठी पुढील दोन अटी महत्त्वाच्या आहेत.

1. लोकांच्या आवडीनिवडी आणि उत्पन्नाची वाटणी दिलेली असेल तर राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास कल्याणात वाढ होते.

2. कल्याणाच्या महत्तमीकरणासाठी राष्ट्रीय उत्पन्नाच्या वाटणीला समान महत्त्व आहे. प्रा. पिगू यांनी आर्थिक कल्याणाची संकल्पना राष्ट्रीय उत्पन्नाशी जोडलेली आहे. राष्ट्रीय उत्पन्न हे आर्थिक कल्याणाचे एक निदर्शक आहे. देशातील राष्ट्रीय उत्पन्नाची वाटणी स्थिर असेल तर राष्ट्रीय उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर आर्थिक कल्याणात वाढ आणि राष्ट्रीय उत्पन्नातील घटीबरोबर आर्थिक कल्याणात घट होते.

राष्ट्रीय उत्पन्न स्थिर असताना जर श्रीमंताकडून गरिबांकडे उत्पन्नाचे हस्तांतरण झाले तर कल्याणात सुधारणा होते. उत्पन्न या विषयाचा संबंध घटत्या सीमांत उपयोगितेशी निगडीत आहे. श्रीमंतांकडून गरिबांकडे जेव्हा उत्पन्नाचे हस्तांतरण होते तेव्हा सामाजिक कल्याणात वाढ होते याचे मुख्य कारण म्हणजे गरिबांच्या तीव्र गरजांची पूर्तता होते. आर्थिक समानतेमुळे कल्याणाचे महत्तमीकरण होते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सामाजिक कल्याणात वाढ होण्याच्या दृष्टीने पिगू यांनी दोन निकष स्पष्ट केलेले आहेत.

(1) समाजाच्या आर्थिक कल्याणाचे मापन पैशातील मूल्यात केलेले आहे. संसाधनांचा पुरवठा स्थिर असताना राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास सामाजिक कल्याणात वाढ होते. प्रा. पिगू यांच्या मते, राष्ट्रीय उत्पन्न महत्तम केल्यास महत्तम सामाजिक कल्याण साध्य होते. राष्ट्रीय उत्पन्न महत्तम करण्यासाठी उत्पादन साधने कमी उत्पादक क्षेत्राकडून जास्त उत्पादक क्षेत्राकडे हस्तांतरित झालेली पाहिजेत. यासाठी साधनसामग्रीचे योग्य वाटप झाले पाहिजे. अशा रीतीने इतर परिस्थिती कायम असताना राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाल्यास समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ होते. देशातील लोकांच्या वस्तू व सेवांच्या उपभोगात वाढ होते.

(2) उत्पन्नाचे समान वाटप झाले पाहिजे म्हणजेच पैशाच्या स्वरूपातील उत्पन्न वितरणात परिपूर्ण समानता असली पाहिजे. प्रा. पिगू यांच्या मते, समाजाच्या आर्थिक कल्याणात वाढ होण्यासाठी वास्तव राष्ट्रीय उत्पन्नाचे समाजात समान वाटप झाले पाहिजे.

श्रीमंत आणि गरीब यांच्यातील दरी कमी झाली पाहिजे. यासाठी पिगू यांनी पुढील दोन गृहीते विचारात घेतलेली आहे.

(अ) पैशाच्या स्वरूपातील उत्पन्नाबाबत घटत्या सीमांत उपयोगितेचा नियम लागू होतो.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A

(ब) सर्व व्यक्तींची समाधान प्राप्त करण्याची क्षमता सारखीच असते.

वरील दोन गृहीते विचारात घेता गरिबांच्या तुलनेत श्रीमंतांकडे जास्त उत्पन्न असते. त्यामुळे गरिबांच्या तुलनेत श्रीमंतांच्या बाबतीत पैशाची सीमांत उपयोगिता कमी असते. गरिबांचे उत्पन्न अल्प असल्याने गरिबांच्या दृष्टीने श्रीमंतांच्या तुलनेत पैशाची सीमांत उपयोगिता जास्त असते. श्रीमंतांकडून गरिबांकडे वास्तव उत्पन्नाचे हस्तांतरण झाल्यास गरीब लोकांच्या तीव्रता असणाऱ्या गरजांची पूर्तता होऊन सामाजिक कल्याणात वाढ होते. मात्र श्रीमंतांकडून गरिबांकडे उत्पन्नाचे हस्तांतरण होताना उद्योगांच्या, उपक्रमांच्या उत्पादन भांडवली साधनसामग्रीच्या विकासावर विपरीत परिणाम होऊ नये.

अशा प्रकारे पैशातील राष्ट्रीय उत्पन्न समाजात समान प्रमाणात वितरित केल्यास सामाजिक कल्याणात अधिकतम वाढ होते. वरील दोन निकषांना/कसोट्यांना महत्तम कल्याणवाढीच्या द्विविध कसोट्या असे म्हणतात.

खासगी खर्च आणि सामाजिक खर्च यामध्ये प्रा. पिगू यांनी फरक केलेला आहे. वस्तूचा खासगी सीमांत खर्च म्हणजे वस्तूचा एक अतिरिक्त नग उत्पादन करण्याचा खर्च होय. सामाजिक सीमांत खर्च म्हणजे वस्तूचा एक नग उत्पादित केल्यामुळे समाजात होणारी हानी किंवा नुकसान होय. वस्तूच्या विक्री किंमतीवरून खासगी सीमांत लाभाचे मापन केले जाते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सामाजिक सीमांत लाभ म्हणजे उत्पादनाच्या एका अतिरिक्त एककापासून समाजाला मिळणारा लाभ होय. आर्थिक व्यवहाराच्या सामाजिक आणि खासगी मूल्यांकनामध्ये फरक करून पिगू यांनी सामाजिक कल्याण अर्थशास्त्रातील बाह्य परिणाम किंवा बाह्यतेचे विश्लेषण केलेले आहे.

प्रा. पिगू यांच्या मते, उत्पादनातील बाह्य परिणाम सामाजिक निव्वळ उत्पादन आणि खासगी निव्वळ उत्पादन यांच्या तफावतीमध्ये दिसून येतो. सामाजिक निव्वळ उत्पादन म्हणजे "राष्ट्रीय उत्पन्नात केलेले एकूण योगदान होय." खासगी निव्वळ उत्पादन म्हणजे विकले जाण्यास सक्षम असणाऱ्या उत्पादनाचे योगदान होय. खासगी निव्वळ उत्पादनामुळे गुंतवणूक करणाऱ्या व्यक्तीच्या प्राप्तीमध्ये किंवा कमाईमध्ये भर पडते.

दोन उत्पादनांमधील भिन्नता उत्पादनाच्या सीमांत वाढीसह उत्पादनाच्या बाह्य प्रभावाच्या रूपासह दर्शविली जाते. काही बाबतीत सामाजिक निव्वळ उत्पादन हे खासगी निव्वळ उत्पादनापेक्षा जास्त असते तर काही बाबतीत खासगी निव्वळ उत्पादन हे सामाजिक निव्वळ उत्पादनापेक्षा जास्त असते. या संदर्भात पिगू यांनी खासगी उद्योगसंस्थांमार्फत कामगारांना प्रशिक्षण दिले तर सामाजिक लाभाचे प्रमाण जास्त असते. दुसऱ्या उदाहरणामध्ये जेव्हा खासगी कारखान्याच्या चिमणीतून धूर बाहेर पडतो तेव्हा आजूबाजूच्या परिसरातील वातावरण दूषित होते व त्याचा परिसरातील जनतेच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होतो. परंतु कारखान्याचा मालक कोणत्याही प्रकारची नुकसानभरपाई देत नाही.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

या संदर्भात प्रा. पिगू यांचे असे म्हणणे आहे की, राज्याने खासगी निव्वळ उत्पादन आणि सामाजिक निव्वळ उत्पादनात समानता निर्माण केली पाहिजे. जर उद्योगामध्ये खासगी निव्वळ उत्पादनाचे प्रमाण जास्त असेल तर सरकारने त्या उद्योगावर करआकारणी केली पाहिजे. आणि दुसऱ्या उद्योगामध्ये खासगी निव्वळ उत्पादनाचे प्रमाण कमी असेल म्हणजे निव्वळ सामाजिक उत्पादनाचे प्रमाण जास्त असेल. अर्थसाहाय्य दिले पाहिजे. सरकारने खासगी निव्वळ उत्पादन आणि सामाजिक निव्वळ उत्पादनातील तफावत कमी करून सामाजिक कल्याणात वाढ करावी. प्रा. पिगू यांच्या मते खासगी निव्वळ उत्पादन आणि सामाजिक निव्वळ उत्पादन यामधील तफावत संख्यात्मक आणि पैशाच्या साहाय्याने मोजता येत नाही.

प्रा. पिगू यांनी 'सामाजिक इष्टतम' परिस्थिती निर्माण करण्याचा पहिला प्रयत्न केला. या परिस्थितीला त्यांनी संपूर्ण अर्थव्यवस्थेचे आदर्श उत्पादन असे म्हटले. जेव्हा देशातील सर्व उद्योगांमध्ये सीमांत सामाजिक उत्पादन समान होते आणि वास्तव संपत्तीचे अधिकतम उत्पादन होते तेव्हा सामाजिक इष्टतम परिस्थिती अस्तित्वात येते.

जेव्हा सर्व उत्पादक साधनांना रोजगार उपलब्ध होतो आणि विविध व्यवसाय आणि विविध ठिकाणी खर्चाची हालचाल होत नाही. जेव्हा सर्व उद्योगांमध्ये सीमांत सामाजिक निव्वळ उत्पादनाचे मूल्य समान होते तेव्हा राष्ट्रीय उत्पन्न सर्वांत जास्त होते, असा निष्कर्ष प्रा. पिगू यांनी काढला. जर ही व्यवस्था कायम अस्तित्वात राहिली तर समाजाला त्याचे 'आदर्श' उत्पादन मिळेल.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

पिगू यांचे कल्याणाच्या अर्थशास्त्राचे विवेचन पुढील गृहीतांवर आधारलेले आहे.

(1) प्रत्येक ग्राहक सुज्ञ असतो. प्रत्येक ग्राहकाचे वर्तन तर्कसुसंगत असत, प्रत्येक ग्राहक भिन्न-भिन्न वस्तूंवर खर्च करताना भिन्न-भिन्न वस्तूंच्या उपभोगावरील खर्चापागन महत्तम उपयोगिता मिळविण्याचा प्रयत्न करतो.

(2) उपयोगितेचे मूल्यदर्शी मापन करता येत नाही तर उपयोगितेचे क्रमदर्शी मापन करता येते. उपयोगिता अंकात मोजता येत नाही. उपयोगितेची व्यक्ती-व्यक्तींमध्ये तुलना करता येते. त्या तुलनेच्या आधारे कल्याणात वाढ झाली की घट झाली हे शोधून काढता येते.

(3) समाजातील वेगवेगळ्या व्यक्तींचे वास्तव उत्पन्न वेगवेगळे असले तरी वस्तूच्या समान परिमाणापासून सारखेच समाधान मिळते.

(4) व्यक्तीच्या उत्पन्नात होणाऱ्या वाढीबरोबर पैशाच्या एका एककापासून प्राप्त होणारी सीमांत उपयोगिता क्रमाक्रमाने घटत जाते. श्रीमंतांच्या तुलनेत गरिबांना पैशाची सीमांत उपयोगिता जास्त असते. म्हणून महत्तम सामाजिक कल्याण साध्य करण्यासाठी गरिबांच्या उत्पन्नात वाढ झाली पाहिजे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

4.2.1 पिगू यांच्या कल्याणाच्या अर्थशास्त्राचे मूल्यमापन व टीका

(Evaluation and Critique of Pigu's Economics of Welfare)

मूल्यमापन

प्रा. पिगू यांनी प्रथमत: कल्याणकारी अर्थशास्त्राला सैद्धान्तिक आधार प्रदान केला. त्यांनी आदर्शानुसारी समस्यांची सकारात्मक समस्यांशी सांगड घातली. खासगी आणि सामाजिक निव्वळ उत्पादनांना एकमेकांपासून दूर न जाण्यासाठी सरकारी हस्तक्षेपाचे तर्कसुसंगत समर्थन केले. परंतु पिगू यांचे धोरण मूल्याधारित आहे. त्यांचा अभ्यास हा सैद्धान्तिकतेपक्षा जास्त आदर्शवादी आहे.

प्रा. पिगू यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्र विश्लेषणावरील टीका

(1) **महत्तम कल्याणाची संकल्पना :** प्रा. पिगू यांनी महत्तम कल्याण साध्य करण्यावर भर दिलेला आहे. पिगू यांच्या मते, महत्तम कल्याण राष्ट्रीय उत्पन्नावर अवलंबून असते. परंतु राष्ट्रीय उत्पन्न कधीही स्थिर नसते. महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी नेमकी कोणती धोरणे स्वीकारावीत याबाबत पिगू यांनी स्पष्टीकरण दिलेले नाही.

(2) **उपयोगितेचे मापन :** वस्तू व सेवांच्या विशिष्ट मात्रांचा उपभोग घेतल्यानंतर उपयोगितेचे संख्यात्मक मापन करता येत नाही. कारण उपयोगिता ही मानसिक संकल्पना आहे. व्यक्तिपरत्वे उपयोगिता भिन्न-भिन्न असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(3) राष्ट्रीय उत्पन्न आणि कल्याण : राष्ट्रीय उत्पन्न हा आर्थिक कल्याणाचा एकमेव मापदंड नाही. पिगू यांनी आर्थिक कल्याणाचा संबंध राष्ट्रीय उत्पन्नवाढीबरोबर जोडलेला आहे. देशामध्ये चलनवाढ झाल्यास राष्ट्रीय उत्पन्नाची पातळी वाढते. गरिबांची आर्थिक स्थिती जास्त खालावते आणि आर्थिक कल्याणात वाढ होत नाही. राष्ट्रीय उत्पन्नाचे मापन करणे अवघड असते.

(4) सामाजिक कल्याणात वाढ व घट : सरकारी धोरणामुळे देशातील सर्वच जनतेला लाभ होतो असे नाही. सरकारी धोरणामुळे काही लोकांना फायदा होतो तर काही लोकांचे नुकसान होते. त्यामुळे सरकारी धोरणामुळे सामाजिक कल्याण वाढले की घटले हे स्पष्ट होत नाही. सामाजिक कल्याणाचे नेमके मापन करता येत नाही.

(5) नीतिशास्त्र : प्रा. पिगू यांनी कल्याणाच्या अर्थशास्त्राचा संबंध नीतिशास्त्राबरोबर जोडलेला आहे. कोणते नैतिक निर्णय कल्याणाच्या विश्लेषणासाठी वापरावे याबाबत स्पष्टीकरण दिलेले नाही. पिगू यांनी कल्याणाच्या कारणांचा उद्दिष्टात्मक अभ्यास कल्याणकारी अर्थशास्त्रात केलेला नाही.

(6) समाधान प्राप्त करण्याची क्षमता : प्रा. पिगू यांच्या मते, सर्व उपभोक्त्यांमध्ये महत्तम समाधान प्राप्त करण्याची क्षमता समान असते. परंतु हे तत्त्व नीतीविषयक तत्त्व आहे. त्याला प्रत्यक्ष मापनाचा कोणताही पुरावा नाही. सामाजिक कल्याण महत्तम होण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नाचे समान वितरण होणे आवश्यक असते. व्यक्तीच्या समाधानाची क्षमता वस्तुनिष्ठतेवर अवलंबून असते.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

(7) खासगी आणि सामाजिक उत्पादन भेद : खासगी किंवा मुक्त भांडवलशाही अर्थव्यवस्थेत खासगी आणि सामाजिक उत्पादनामधील भेद शोधता येत नाही. सरकारी हस्तक्षेपाद्वारे खासगी आणि सामाजिक उत्पादनातील भेद दूर करता येतो. परंतु अचलता, अविभाज्यता आणि अपूर्ण ज्ञानामुळे संरचनात्मक अपयश वास्तव जगात निर्माण होते. सामाजिक कृतीद्वारे ही तफावत दूर करता येते.

(8) कल्याणाचे वर्गीकरण : प्रा. पिगू यांनी सर्वसाधारण कल्याणाचे आर्थिक कल्याण आणि आर्थिकेतर कल्याण असे वर्गीकरण केलेले आहे. हे वर्गीकरण ज्या आधारावर केले ते गृहीत म्हणजे सामाजिक कल्याण फलनाचे मापन करताना व्यक्तिगत कल्याण फलनाची केली जाणारी बेरीज होय. टीकाकारांच्या मते, वरील गृहीत अवास्तव आहे कारण उपयोगितेचे संख्यात्मक मापन करणे शक्य नसते.

4.3 कल्याणकारा अर्थशास्त्राविषयी अमर्त्य सेन यांचे विचार

(Thought of Amartya Sen on Welfare Economics)

इ.स. 1998 मध्ये स्वीडिश रॉयल ॲकॅडमी ऑफ सायन्सने अमर्त्य सेन यांना नोबेल पारितोषिकाने सन्मानित केले. इ.स. 1999 मध्ये भारत सरकारने कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल अमर्त्य सेन यांना भारतरत्न हा सर्वोच्च बहुमान देऊन त्यांचा गौरव केला.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

कल्याणाच्या अर्थशास्त्रात मूलभूत समस्यांचे संशोधन करण्यात अमर्त्य सेन यांचे मोलाचे योगदान आहे. त्यांनी सामाजिक निवडीचा स्वयंसिद्ध सिद्धान्त मांडला. कल्याणाची व्याख्या करून दारिद्र्याचा निर्देशांक मांडून दुष्काळाबाबत अनुभवनिष्ठ अभ्यास केला. वितरणाची समस्या आणि समाजातील दुर्बल घटकांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महत्त्वपूर्ण उपाययोजना सुचविल्या.

(1) आर्थिक कल्याण : अमर्त्य सेन यांनी आर्थिक कल्याणाविषयी विचार मांडताना कल्याणाचा व्यापक दृष्टीने विचार केला. गरिबी, दारिद्र्य आणि उपेक्षितांच्या हितासाठी सरकारने अर्थव्यवस्थेत हस्तक्षेप करून दारिद्र्य दूर करण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. जागतिकीकरण आणि उदारीकरणाच्या काळात गरीब व समाजातील दुर्बलांना स्पर्धेला सामोरे जाता यावे म्हणून सरकारने शिक्षण, आरोग्य आणि पोषण आहार यामध्ये मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करून समाजातील दुर्बल व वंचित घटकांना तीव्र स्पर्धेला तोंड देण्यासाठी सक्षम बनविले पाहिजे.

(2) उत्पन्न आणि वितरण : लोकांच्या कल्याणात वाढ होण्यासाठी राष्ट्रीय उत्पन्नात वाढ झाली पाहिजे. परंतु अमर्त्य सेन यांच्या मते, वाढीव उत्पन्नाचे वितरण समाजात कशा प्रकारे होते या बाबींकडे फारसे लक्ष दिले जात नाही या बाबीकडे संपूर्ण जगाचे लक्ष वेधले. त्यांच्या या भूमिकेमुळे विकास प्रक्रियेत उत्पन्नाबरोबर उत्पन्नाचे वितरण आणि सामाजिक कल्याण या बाबींचा विचार करणारी विचारप्रणाली विकसित झाली.

(3) सामाजिक निवडीचा सिद्धान्त : अमर्त्य सेन यांनी सामाजिक निवडीचा सिद्धान्त मांडून कल्याणाच्या अर्थशास्त्रात मोलाची भर घातली. त्यांनी सामाजिक निवडीचा

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

सिद्धान्त मांडताना अरे यांच्या अशक्यता सिद्धान्तावर टीका केली. अरे यांच्या मते, एखाद्या समाजात सर्व व्यक्तींच्या निवडींची बेरीज म्हणजे समाजाची सामाजिक निवड नसते.

सामाजिक निवड लोकशाही पद्धतीने ठरविता येणे शक्य नसते. तर सामाजिक निवड हुकूमशाही पद्धतीने ठरविली जाते. अमर्त्य सेन यांनी अशक्यता सिद्धान्त नाकारला आणि सामाजिक निवडीचा सिद्धान्त मांडला. या सिद्धान्तानुसार काही विशिष्ट परिस्थितीत काही अटी पूर्ण केल्या तर व्यक्तीच्या निवडीच्या बेरजेवरून सर्व समाजाची सामाजिक निवड ठरविता येते. सामाजिक निवड करताना लोकशाही चौकटीत राहून लोकांचे व्यक्तिस्वातंत्र्य व हक्क अबाधित राहू शकतात. याचाच अर्थ सामाजिक निवड करताना लोकशाही किंवा लोकांचे हक्क हिरावून घेण्याची आवश्यकता नसते. लोकशाही अर्थव्यवस्थेत लोकांचे कल्याण करता येते. यावर अमर्त्य सेन यांचा पूर्ण विश्वास आहे.

सामाजिक निवड म्हणजे उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या शासकीय धोरणात पसंतीक्रमाच्या आधारे निवड करणे होय. त्यासाठी विविध प्रकारच्या धोरणांचा समाजातील व्यक्तींच्या पसंती वक्राच्या आधारे क्रम लावला पाहिजे.

महत्तम कल्याण साध्य करण्यासाठी श्रीमंतांपेक्षा गरिबांना उत्पन्नाचा अधिक हिस्सा मिळाला पाहिजे. यामुळे उत्पन्नाचे समान वाटप होऊन गरिबांचा राहणीमानाचा दर्जा सुधारेल. गरिबांमध्ये विविध क्षमतांचा विकास होईल.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

वैयक्तिक मूल्ये आणि सामूहिक निवड यांच्यातील दुवा कशा रीतीने साधावा याबाबतचे विश्लेषण सामाजिक निवडीच्या सिद्धान्तातून मिळते. सामाजिक कल्याणाच्या मापनाची अर्थपूर्ण बांधणी करण्यासाठी संपूर्ण समाजाच्या स्तरावर असणारी पसंती आणि व्यक्तीची पसंती या दोहोंत सुसंगतता आणण्याच्या दृष्टीने सामाजिक निवडीचा सिद्धान्त उपयुक्त ठरतो.

(4) कल्याणाचे मापन : लोकांच्या कल्याणाचे मापन करण्यासाठी दरडोई उत्पन्नाचा निर्देशांक वापरला जातो. या निर्देशकांचा वापर करून समाजाचे कल्याण किती झाले याचे मापन करता येत नाही. अमर्त्य सेन यांच्या मते, एखाद्या वस्तूमुळे ती वस्तू आहे म्हणून कल्याण निर्माण होत नाही तर कल्याणाच्या निर्मितीसाठी ती वस्तू उपभोगासाठी किंवा अर्थप्रक्रियेसाठी वापरली पाहिजे. अशा वस्तूपासून कल्याण साध्य करण्यासाठी उत्पन्नाची आवश्यकता असते. 'उत्पन्नामुळे कल्याणाच्या संधी निर्माण होतात. यालाच क्षमता असे म्हटले जाते.' क्षमता किंवा संधी शिक्षण आणि आरोग्य सुविधांमुळे निर्माण होतात म्हणून कल्याणाचे मापन करताना उत्पन्न, शिक्षण आणि आरोग्य या विविध घटकांचा विचार केला पाहिजे.

कल्याण निर्देशांक : कल्याण निर्देशांक तयार करताना अमर्त्य सेन यांनी उत्पन्न वितरण विचारात घेतले.

YG (1-G)   Y- दरडोई उत्पन्न   G-गिनी गुणक

अशा रीतीने कल्याणाचे मापन करताना सेन यांनी आरोग्य घटकाचा देखील विचार व्हावा असे प्रतिपादन केले. संयुक्त राष्ट्र संघटनेने सेन यांचे मत विचारात घेऊन

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

मानव विकास निर्देशांक तयार करताना शिक्षण आणि आरोग्य हे दोन घटक विचारात घेतले.

(5) दारिद्र्य : दारिद्र्याचे मापन करण्यासाठी दारिद्र्य निर्देशांक वापरला जातो. या निर्देशांकामुळे समाजात दारिद्र्य रेषेखालील उत्पन्न असणारे किती लोक किंवा व्यक्ती आहेत हे समजते. परंतु दारिद्र्य रेषेखालील लोकांमध्ये दारिद्र्याचे प्रमाण कसे आहे हे समजत नाही. या संकल्पनेत दारिद्र्य रेषेखालील गरिबांमध्ये असणाऱ्या विभिन्न उत्पन्न स्तरांचा विचार होत नव्हता. जोपर्यंत दारिद्रय रेषा पार करून व्यक्तीचे उत्पन्न वाढत नाही तोपर्यंत उत्पन्नात परिणामकारक वाढ झाली असली तरी दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्येत बदल होत नव्हता. ही त्रुटी विचारात घेऊन अमर्त्य सेन यांनी पाच वाजवी प्रमाणभूत तत्त्वे विचारात घेऊन त्या आधारे दारिद्र्याचा निर्देशांक तयार केला.

P = HO (1 + (1 - 1)0 4)

येथे 4 म्हणजे गिनी गुणक आणि 1 म्हणजे उत्पन्न वितरणाचे मापन (0 आणि 1 च्या दरम्यान) या दोन्हींचे मापन निव्वळ दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या व्यक्तींसाठी करण्यात आले. सेन यांनी विकसित केलेल्या दारिद्र्य निर्देशांकामुळे दारिद्र्य मापनाची पद्धती विकसित झाली. दारिद्र्य मापनाच्या या पद्धतीचा वापर गरिबांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारण्यासाठी करण्यात आला.

(6) दुष्काळ आणि उपासमारी : अमर्त्य सेन यांनी अन्नधान्याच्या पुरवठ्यात लक्षणीय घट न होता वेतनाचा घटता दर, अन्नधान्याच्या वाढत्या किंमती, निष्कृष्ट वितरण

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

व्यवस्था यामुळे समाजातील विशिष्ट वर्गांवर उपासमारीची वेळ येते. त्याचप्रमाणे उपासमारीच्या भागात अन्नधान्याची आयात होऊनदेखील दुष्काळी स्थिती निर्माण झाल्याचे निदर्शनास आणले. सेन हे दुष्काळाची स्थिती आणि उपासमार या दोन गोष्टी वेगवेगळया मानतात. दुष्काळाच्या स्थितीत उपासमार असते परंतु याउलट उपासमारीच्या स्थितीत दुष्काळ राहीलच असे नाही तसेच उपासमार म्हणजे दारिद्र्य हे अभिप्रेत आहे. उपासमार नसताना देखील दारिद्र्य अस्तित्वात राहू शकते.

उपासमारीमुळे समाजाच्या आर्थिक कल्याणात घट होते. सरकारने दुष्काळ व उपासमारीच्या काळात भक्कम उपाययोजना करून सार्वजनिक वितरण व्यवस्था सक्षम करावी, अन्नधान्यांच्या किमती स्थिर ठेवाव्यात. लोकशाही देशात लोकप्रतिनिधींनी जनतेच्या मागण्याप्रती अधिक संवेदनशील राहिले तर दुष्काळाची तीव्रता कमी होईल.

(7) शिक्षण आणि आरोग्य : अमर्त्य सेन यांच्या मते, देशात शिक्षणाचा वाढला तर उच्च दर्जाचे तंत्रज्ञान वापरता येते. देशातील सर्व नागरिकांच्या शिक्षण आणि आरोग्याची काळजी घेतल्यास विकासाला चालना मिळते. म्हणून सरकारने शिक्षण सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. आरोग्य सुविधांवर खर्च करावा, जनतेच्या राहणीमानात सुधारणा करावी. सकस आहार व विचाराची सांस्कृतिक पातळी उंचावणे हा कल्याणकारी अर्थशास्त्राचा राजमार्ग आहे. शिक्षणामुळे माणूस साक्षर, सुशिक्षित आणि सुसंस्कृत बनतो. आरोग्याचे अर्थशास्त्र समजले तर कल्याणाची संकल्पना आपोआप सिद्ध होते.

(8) आर्थिक विकास आणि कल्याण : पारंपरिक आर्थिक विकासाच्या संकल्पनेत केवळ राष्ट्रीय उत्पादनात वाढ किंवा विशिष्ट वस्तू व सेवांच्या पुरवठ्यात वाढ यावर भर

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

दिलेला आहे. यामुळे आर्थिक विकासावर मर्यादा येतात. अमर्त्य सेन यांच्या मते, आर्थिक परिणामावर व्यक्तीची मालकी आणि क्षमता विकासाचा विस्तार या दोन गोष्टींवर आर्थिक विकास अवलंबून असतो. व्यक्तीच्या कार्य करण्याच्या क्षमतेवरून ती व्यक्ती गरीब आहे की श्रीमंत आहे हे ठरते. आर्थिक वाढ म्हणजे गरजांची पूर्तता नव्हे तर मानव जे जीवन जगतो आणि जे स्वातंत्र्य उपभोगतो त्याच्या दर्जात वाढ करणे होय. यालाच अमर्त्य सेन यांनी 'क्षमता विकास दृष्टिकोन' असे म्हटलेले आहे. यामध्ये हक्क प्रदानता, विविध क्षमता, क्रियाशीलता, स्वातंत्र्य, प्रत्यक्ष फायदे व वास्तव उत्पन्नातील फरक यांचा समावेश केलेला आहे.

अमर्त्य सेन यांनी वंचितता, विषमता, नीतिमत्ता आणि व्यक्तीची क्षमता या मानवी जीवनाशी अतूट नाते असणाऱ्या प्रश्नांचे विश्लेषण केले.

अमर्त्य सेन यांनी सामान्य माणूस केंद्रबिंदू मानला व मानवाचे अधिकाधिक कल्याण होण्यासाठी पुढील उपाययोजना सुचविल्या.

1. सर्वसामान्यांच्या आरोग्याकडे लक्ष देऊन त्याच्या आरोग्याची पातळी उंचावणे.

2. निरक्षरता संपुष्टात आणणे आणि शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार करणे.

3. स्त्री-पुरुष भेद नष्ट करून स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने शिक्षण व इतर संधी उपलब्ध करून देणे.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

4. जमीन सुधारणा कार्यक्रमाची अंमलबजावणी करून शेती कार्यक्षम करणे.

अमर्त्य सेन यांच्या आर्थिक कल्याणाविषयीच्या विचारांचा प्रभाव संयुक्त राष्ट्र संघटना (UNO), आंतरराष्ट्रीय श्रम संघटना (ILO), आणि जागतिक बँक (World Bank) या आंतरराष्ट्रीय संघटनांवर झालेला आहे.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.

खालील प्रश्नांची एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.

1. कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या द्या.

2. कल्याणकारी अर्थशास्त्राची दोन वैशिष्ट्ये सांगा.

3. प्रा. पिगू यांची कल्याणकारी अर्थशास्त्राची व्याख्या द्या.

4. कल्याण महत्तमीकरणाच्या दोन अटी सांगा.

5. आर्थिक कल्याणाची व्याख्या द्या.

6. खासगी, सीमांत खर्च म्हणजे काय ?

7. सामाजिक सीमांत लाभ म्हणजे काय ?

8. कल्याणकारी अर्थशास्त्रातील योगदानाबद्दल नोबेल पारितोषिक कोणत्या भारतीय वंशाच्या अर्थशास्त्रज्ञाला मिळाले ?

9. सामाजिक निवड म्हणजे काय ?

* खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा.

1. कल्याणकारी अर्थशास्त्राची संकल्पना स्पष्ट करा.

2. सामाजिक कल्याणात वाढ करण्यासाठी पिगू यांचे दोन निकष स्पष्ट करा.

3. पिगू यांच्या कल्याणाच्या अर्थशास्त्राची गृहीते स्पष्ट करा.

4. अमर्त्य सेन यांचा सामाजिक निवडीचा सिद्धान्त स्पष्ट करा.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

5. कल्याणकारी अर्थशास्त्र म्हणजे काय ? कल्याणकारी अर्थशास्त्राची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

6. प्रा. पिगू यांची कल्याणाच्या महत्तमीकरणाची संकल्पना स्पष्ट करा.

7. पिगू यांच्या कल्याणाच्या अर्थशास्त्राचे मूल्यमापन स्पष्ट करा.

8. अमर्त्य सेन यांनी मानवाचे अधिकाधिक कल्याण होण्यासाठी कोणत्या उपाययोजना सुचविल्या.

*** खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

1. प्रा. पिगूच्या कल्याणकारी अर्थशास्त्राची संकल्पना स्पष्ट करा.

2. प्रा. पिगू यांच्या कल्याणकारी अर्थशास्त्राच्या संकल्पनेचे टीकात्मक परिक्षण करा.

3. अमर्त्य सेन यांचे कल्याणकारी अर्थशास्त्राविषयीचे विचार स्पष्ट करा.

HRM Micro Eco (S1) S.Y.B.A.

संदर्भसूची

1. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म) अथर्व प्रकाशन,डॉ.आर.जी.आघाव,डॉ.टि.जी.गिते,प्रा.आर.डी.जाधवर.2013.

2. व्यवसायिक अर्थशास्त्र (सूक्ष्म)निराली प्रकाशन,डॉ.डी.जी.उशीर,डॉ.आर.के.दातीर,एस.आर.जावळे,श्रीमतीबी.डी.पाटील,डॉ.जी.आर.पिंपळे, प्रथमावृत्ती, जुलै 2019.
3. सूक्ष्म अर्थशास्त्र(अर्थशास्त्र स्पेशल पेपर 1)डॉ. डी.जी उशीर, डॉ.एस. आर. जावळे ,डॉ. एच.डी आव्हाड ,डॉ. डी .बी. पवार ,निराली प्रकाशन, (सेमिस्टर 3) प्रथमावृत्ती ,जुलै 2020.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.

HRM Micro Eco (S1)S.Y.B.A.